MHSC170001972018

किरकोळ अर्ज – ३/२०१८

**राजेंद्र उर्फ जॉर्ज रफायल केदारी**

**वि.**

**वर्षा गृहनिर्माण भाडेकरू मालकी हक्क सह. सोसा. सीरसगाव**

सदरचा अर्ज अर्जदाराने दावा दाखल करण्यासाठी झालेला उशीर माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

अर्ज कलम १ वरील मिळकत ही वर्षा गृहनिर्माण मालकी हक्क सहकारी सोसायटी मर्यादित, शिरसगांव या संस्थेने धारण केलीली मिळकत आहे. अर्जदार हा सदर संस्थेचा सभासद होता व आहे. सभासद या नात्याने अर्ज कलम १ मध्ये प्लॉट नं. १४अ गट नं ४३ हा अर्जदारास अलाउट करण्यात आलेला आहे. अर्जदार हा सदर प्लॉटच्या ताब्यात असून महसूल दप्तरी व ग्रामपंचायत रोकॉर्डला देखील अर्जदारच्या नावाच्या नोंदणी आहे. अर्जदार सन १९९६ पासून ग्रामपंचायत कर भरतात.

सा.वाला नं. २ सुरेखा जॉन केदारी ही अर्जदाराची नातेवाईक असून तिच्यानावे देखील वरील गृहनिर्माण संस्थेत वेगळा प्लॉट आहे. अर्जदार व सा.वाला नं. २ व तिचे पती यांचे कौटुबिक संबंध चांगले आहे. या गोष्टीचा गैर फायदा घेवून अर्जदाराचे गैरहजरीत सा. वाला नं. २ हिने सा.वाला. नं ३ ते ७ जे सा.वाला नं १ संस्थेचे पद अधिकारी होते त्याच्याशी संगणमत करुन अर्जदाराचे खोटे राजीनामा पत्र दाखवून व खोट्या सह्या करुन अर्जदाराने सा. वाला. नं.१ संस्थेच्या सभासदत्वाचा राजिनामा दिलेला नसतांना खोटे व बनावट प्रोसिंडिंग तयार केले व अर्जदाराच्या जागी सा. वाला नं. २ च्या नावे खोटे रेकॉर्ड तयार केले.

अर्जदार यांना त्याचे कडील मिळकती वर घर बांधणी करावयाची असल्याने त्यांनी शिरसगांव येथे येवून मे २०१६ मध्ये कागदपत्रांची अवश्यकता भासल्याने चौकशी केली असता सा. वाला नं १ यांनी संस्था अवसायनात गेल्याचे समजले तसेच सा. वाला १ चे पदाधिकाऱ्यांनी संगणमताने ठराव करुन सा. वाला नं २ यांच्या नावावर अर्जदाराचा प्लॉट वर्ग केल्याचे समजले.

दिनांक ०२/०६/२०१६ अर्जदार यांनी सा.वाला नं. १ यांचे अवसायक यांच्याकडे तक्रारी अर्ज केला. तसेच संस्थेने हस्तांतरणाबाबत केलेला ठराव व इतर कागदपत्रांची सा.वाला नं. १ कडे कागदपत्रांची मागणी केली.

सदर तक्रारी अर्जाची वारंवार विचारणी केली असता खुलासा मिळालेला नाही. सा. वाला नं १ कडे संस्थेच्या कागदपत्रांची मागणी केली असता अर्जदाराचे तथाकथित राजीनामा पत्र पंचकमिटी मिटिंग दिनांक १४/०८/२०१० ची प्रोसिडिंग ची प्रमाणित प्रत अर्जदारास डिसेंबर २०१७ च्या सुमारास देण्यात आली. अर्जदाराने सा. वाला यांना विचारणा केली असता सा. वाला नं १ यांनी रेकॉर्ड दुरुस्ती बाबत संबधितांची परवाणगी घेवून कार्यावाही करण्याचे स्पष्ट शब्दात कबूल केले. तथापि त्याबाबत सा. वाला नं. १ कडून कोणतीही कार्यवाही न

झाल्यामुळे व संस्था अवसायनात गेलेली असल्यामुळे वरील गोष्टींबाबत अवसायकाच्या विरुद्ध दावादाखल करणेकामी मा. साहाय्यक निबंधक सहकारी संस्था, श्रीरामपूर यांच्या कडे दिनांक २२/०३/२०१८ रोजी अर्ज दाखल केला. त्यानुसार दिनांक २७/०३/२०१८ रोजी अवसायक यांच्या विरोधात दावा दाखल करण्याचा आदेश पारित केला. व त्या आदेशाची प्रत अर्जदारास प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराने सा. वाला नं. १ ते ७ यांच्या विरुद्ध जाहीर ठराव, मनाई इत्यादी साठी कोर्टात दावा दाखल केलेला आहे. अर्जदार हा ठाणे येथे नोकरीसाठी वास्तव्यास आहे. वरील नमुद सर्व गोष्टी अर्जदार श्रीरामपूर येथे नसल्यामुळे घडलेल्या आहेत त्यामुळे अर्जदाराने सर्व गोष्टींची शहानिशा करुन दावा दाखल करण्यास उशिर झालेला आहे. त्यामुळे अर्जदाराने झालेला उशीर माफ करण्यात येवून दावा दाखल करुन घेण्याकामी विनंती केली आहे.

गैरअर्जदाराने नि. 24 वर त्याचे म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदार यांनी अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. त्यांनी पुढे जाऊन म्हणले अशी की,अर्ज कायदेशीर नाही, मुदतीत नाही, अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही, अर्जदाराने काही गोष्टी लपवून ठेवल्या आहेत.

गौरर्जदार यांनी खरी वस्तुस्थिती मधे म्हणले आहे की, दावा मिळकत ही लताबाई फ्रान्सिस ब्राह्मणे यांनी सामनेवाले न.1 संस्थेने अलोट केली होती. लताबाई या अर्जदार आणि व सामनेवाला 2 आणि त्याचे पती यांच्या नातेवाईक आहेत. लताबाई यांनी दावा मिळकत देण्याची इच्छा व्यक्त केली. अर्जदार हा सामनेवाला न.2 यांच्या भावाचा लहान भाऊ असल्याने व एकत्र कुटुंबात राहत असल्याने भाव भावांचे चांगले संबंध असल्याने सामनेवाला न.2 यांनी अर्जदार यांचे नावावर सामनेवाला न.1 संस्थेचे शेअर घेतले होते. लताबाई ब्राह्मणे यांनी राजीनामा दिल्यानंतर सदरहू प्लॉट लताबाई व सामनेवाला ना.2 यांच्या विनंतीवरून सामनेवाला ना.1 संस्थेने अर्जदार यांचे नावावर अलोट केला होता.त्यानंतर अर्जदार यांची आई व सामनेवाला न.2 यांची सासू मयत झाल्यानंतर सर्वांमध्ये चर्चा होऊन, अर्जदार यांनी सदर प्लॉट सामनेवाला न.2 यांचे नावे करून देतो असे सांगितले. त्यानंतर योग्य ती कायदेशीर कारवाई करून सामनेवाला न.2 यांचे नावे करून दिले. महसूल अधिकारी यांनी देखील अर्जदार यास नोटीस काढून सदरची संपूर्ण कायदेशीरपणे प्रक्रिया पार पडली. सदर कारणास्तव अर्जदाराचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकला.

अर्ज आणि त्यावरील म्हणणे विचारात घेतले. त्यानुसार असे निदर्शनासआले की, अर्जदार हे बाहेरगावी असल्याचा फायदा घेऊन गैरअर्जदार यांनी त्यांची जागा स्वतःच्या नावे करून घेतली. आणि गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार यांनी स्वतःहून ती जागा यांनी दिली आहे. वरील विधानानुसार कोणाचे म्हणणे खरे आहे हे निश्चित करण्यासाठी दोन्ही बाजूंना पुरावे सादर करून ते दाखवून द्यावे लागेल. यापुढे जाऊन अर्जदार यांचे म्हणेनुसार त्यांची संमती नसताना हे सर्व घडलेले आहे, आणि सदर गोष्टीची माहिती घेण्यासाठी त्यांना बराच कालावधी गेला आहे. त्यामुळे सदरचा दावा दाखल करण्यासाठी त्यांना उशीर झालेला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा आणि अधिनियम कलम ९२ (३) नुसार, Notwithstanding anything contained in sub sections (1) and (2),(the co operative court) may admit a dispute after the expiry of the limitation period if the applicant satisfied ( the co operative court) that he had sufficient cause for not referring the dispute within such period and the dispute so admitted

A

shall be a dispute which shall not be barred on the ground that the period of limitation had expired. या कलमानुसार दावा दाखल करण्यासाठी जरी विलंब झाला असेल तर तो दावा दाखल करून घेता येतो.

उपरोक्त अर्जदाराच्या शपथेवरील कथनाचा विचार करता सदरचा दावा दाखल करण्यासाठी झालेला उशीर हा संयुक्तिक आहे असे गृहीत धरता येईल. यापुढे जाऊन अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जामुळे आजपर्यंत जे काही सोसावे लागले आहे जसे की त्यांचा वेळ, आर्थिक त्रास, मानसिक त्रास, आणि प्रत्येक वेळी तारखेला हजर राहण्यासाठी त्यांनी त्यांची रोजची कामे सोडून यावे लागले त्यासाठी अर्जदार यांच्यावर आर्थिक जिम्मेदारी लादली तर उपयुक होईल असे वाटत आहे. त्यामुळे उपरोक्त चर्चेवरून अर्जदाराचा अर्ज मजूर होण्यासाठी पात्र आहे.सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) अर्जदाराचा अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो. अर्जदाराला दावा दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

२) अर्जदार यांना आदेशित करण्यात येते की रक्कम रुपये ५,०००/- गैरअर्जदार यांना आजरोजी किंवा पुढील तारखेपर्यंत देण्यात यावे.

3) किरकोळ अर्ज ०३/२०१८ निकाली काढण्यात आला.

४) कार्यालयास (Shirestedar) आदेशीत करण्यात येते की, सदरचा दावा नोंदणी करून घेण्यात घ्यावा.

दिनांक : १८.०७.२०२६

Shweta 18/07/26
न्यायाधीश

सहकार न्यायालय श्रीरामपूर